# प्रेसनोट दि. २१/१२/२०२०

## पिपरी-चिंचवड, गुन्हे शाखा युनिट- ४ कडुन घरफोड्या करणाऱ्या विधिसंघर्षीत बालका कडुन घरफोडी व वाहन चोरीचे ०९ गुन्हे उघड

## एकुण ०७,६८,५५०/- रु. किं. चा मुद्देमाल जप्त

**मा. कृष्ण प्रकाश सो, पोलीस आयुक्त, पिंपरी-चिंचवड** यांनी पिंपरी चिंचवड परिसरात घडणारे घरफोडीचे तसेच वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणुन प्रतिबंध करण्याचे आदेश दिल्याने **मा. सुधीर हिरेमठ सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे शाखा** यांनी गुन्हे शाखेचे सर्व अधिकारी व अंमलदार यांना रेकॉर्ड वरील घरफोडी तसेच वाहन चोरी करणाऱ्या गुन्हेगारांच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवुन घरफोडीचे गुन्हे उघडकिस आणण्याचे आदेशित केले होते.

या अनुशंगाने **गुन्हे शाखा युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक प्रसाद गोकुळे** यांचे मार्गदर्शनाखाली रेकॉर्ड वरील गुन्हेगारांची तपासणी करण्यासाठी पोहवा/२५० नारायण जाधव, पोहवा/५१७ प्रविण दळे, पोना/९१६ तुषार शेटे, पोशि/४९८ शावरसिद्ध पांढरे, पोशि/२१०२ प्रशांत सैद, पोशि/१५१६ सुरेश जायभाये यांचे पथक तयार केले होते. सदर पथकातिल **पोशि/४९८ शावरसिद्ध पांढरे**, यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक सराईत गुन्हेगार हा त्याचे एका साथिदारासह नाशिक फाटा येथे चोरीचा मुद्देमाल विक्रीकरिता येणार आहे. सदर बातमीच्या अनुशंगाने गुन्हे शाखा युनिट-४ चे पथकाने नाशिक फाटा येथे सापळा लावुन एक विधिसंघर्षग्रस्त बालक, वय-१५ वर्षे, रा- चक्रपाणी वसाहत, भोसरी यास चोरीच्या काही मुद्देमालासह ताब्यात घेतले. त्यावेळी त्याचा एक साथिदार सदर सराईत गुन्हेगार नामे किरण गुरुनाथ राठोड, रा- दिघी रोड, भोसरी, पुणे हा त्या ठिकाणावरुन पळुन गेला होता. सदर विधिसंर्षग्रस्त बालकास ताब्यात घेवुन त्याचे कडे कसोशिने तपास केला असता त्याने व त्याचे साथिदार नामे १) किरण गुरुनाथ राठोड, रा- दिघी रोड, भोसरी, २) शेखर संभाजी जाधव, रा- सदगुरु नगर, भोसरी ३) विकी कमल मांझी रा.भोसरी व ४) कृष्णा उर्फ बॉबी संजय तांगतोडे रा. नाशिक यांचेसह मिळुन पिंपरी चिंचवड परिसरात घरफोडी व वाहन चोरीचे खालील **०९ गुन्हे** केल्याचे निष्पन्न झाले आहे.

**१) भोसरी पोलीस ठाणे गु.र.नंबर-५८७/२०२० भा.दं.वि.कलम- ४५७,३८०**
**२) भोसरी पोलीस ठाणे गु.र.नंबर-५४६/२०२० भा.दं.वि.कलम- ४५७,३८०**
**३) भोसरी पोलीस ठाणे गु.र.नंबर-६७९/२०२० भा.दं.वि.कलम-३८०**
**४) भोसरी पोलीस ठाणे गु.र.नंबर-६०३/२०२० भा.दं.वि.कलम-३७९**
**५) निगडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-४४३/२०२० भा.दं.वि.कलम-४५४,४५७,३८०**
**६) निगडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-४८३ /२०२० भा.दं.वि.कलम-४५४,४५७,३८०**
**७) निगडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-३१३/२०२० भा.दं.वि.कलम-४५४,४५७,३८०**
**८) निगडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-४८२/२०२० भा.दं.वि.कलम-३७९**
**९) निगडी पोलीस ठाणे गु.र.नंबर-१७७/२०२० भा.दं.वि.कलम-४५४,४५७,३८०**

**त्याचे कडुन तपासादरम्यान घरफोडी व वाहन चोरीच्या गुन्ह्यांतील चोरीस गेलेले ६६ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, २८ ग्रॅम वजनाचे चांदीचे दागिने, ०४ एल.सी.डी.टि.व्ही, ०३ मोटारसायकल, ०१ लॅपटॉप, ०१ सॅमसंग कंपनीचा टॅब, ०१ मोबाईल फोन, व ०४ मनघटी घडयाळे, गॅस सिलेंडर व शेगडी असा एकुण ०७,६८,५५०/- रु कि चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.**

यातिल निष्पन्न आरोपी हे रेकॉर्डवरिल घरफोडी,जबरी चोरी व वाहन चोरी करणारे सराईत गुन्हेगार असुन आरोपी नामे १) किरण गुरुनाथ राठोड याचेविरुद्ध **०४**, २) शेखर संभाजी जाधव याचेविरुद्ध **२३** ३) विकी मांझी याचेविरुद्ध **१८** ४) कृष्णा उर्फ बॉबी संजय तांगतोडे याचेविरुद्ध **१९** गुन्हे नोंद असुन आरोपी २, ३ व ४ हे सध्या घरफोडीचे व जबरी चोरीचे इतर गुन्ह्यात येरवडा कारागृहात दाखल आहेत.

**सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त, मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मा. श्री. राजाराम पाटील सो, पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मा. श्रीमती प्रेरणा कट्टे सो, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, दादाभाऊ पवार, अदिनाथ मिसाळ,**

तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, आजिनाथ ओंबासे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, तसेच तांत्रिक विश्लेषन विभाग गुन्हे शाखेचे नागेश माळी, राजेंद्र शेटे, यांनी केली आहे

